**प्रेस नोट दि.१०/०२/२०२२**

**निलम श्रमजीवी नगर मार्कडेय चौक एमआयडीसी रोड सोलापूर येथील घरात चालणारे कुंटणखान्यावर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने छापा टाकून पिडीताची मुक्तता केली**

एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीतील निलम श्रमजीवीनगर मार्कडये चौक प्लॉट नंबर ७९३ या घरात बेकायदेशीरपणे कुंटणखाना चालु असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर बातमीवरुन दि.०८/०२/२०२४ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षातील पोलीस निरिक्षक महादेव राऊत व पोलीस अंमलदार यांनी सदर ठिकाणी छापा टाकण्याकरिता सापळा रचून निलम श्रमजीवीनगर प्लॉट नंबर ७९३ या घरात बोगस गिऱ्हाईक पाठवून बातमीची खात्री करुन १५.५५ वाजता सदर ठिकाणी छापा टाकण्यात आला.

यातील महिला आरोपी नामे गंगुबाई आण्णप्पा रोकडे वय ५० राहणार निलम श्रमजीवीनगर मार्कडेय चौक सोलापूर ही घरमालकीन आपले राहते घरात पिडीत एका महिलेची पिळवणूक करुन तिला वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडून तिचेकडून वेश्या व्यवसाय करवून घेवून तिचे येणारे कमाईवर स्वत:ची उपजिविका करीत असताना मिळून आल्याने सदर आरोपीविरुध्द **एमआयडीसी पोलीस ठाणे गुरंन.०४९/२०२४ अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५ व ६ सह भादविसंक. ३७० (अ)(२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.** सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरिक्षक महादेव राऊत हे करीत असून आरोपीस मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने आरोपीची गुन्हयाचे तपासकामी दिनांक १२/०२/२०२४ पर्यत पोलीस कस्टडी रिमांड दिलेली आहे.

पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर हद्दीत बेकायदेशीरपणे चालणा-या कुंटणखान्यावर अशाच पध्दतीने यापुढेही अनैतिक मानवी वाहतुक प्रतिंबध कक्ष, सोलापूर शहर यांच्या कडून कारवाई करण्यात येणार असून शहरातील बेकायदेशीरपणे चालणारे कुंटनखाने बंद करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त श्री. एम.राजकुमार व मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा) श्रीमती डॉ दिपाली काळे, सहा.पोलीस आयुक्त गुन्हे श्रीमती प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडील पोलीस निरिक्षक महादेव राऊत व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडील सफौ.राजेंद्र बंडगर, सफौ हेमंत मंठाळकर,पोना/७७० अ.सत्तार पटेल ,मपोहेकॉ अकिला नदाफ, मपोहेकॉ सुशिला नागरगोजे, मपोकॉ सुजाता जाधव मपोकॉ मंडलिक, मपोकॉ उषा माळगे, मपोकॉ सिमा खोगरे, मपोकॉ,भुजबळ, व चालक पोकॉ मुजावर यांनी शिताफिने कामगीरी करून सदरचा छापा यशस्वी केला.

(प्रांजली सोनवणे)
सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे
सोलापूर शहर

Scanned with CamScanner